**L. A. BILL No. XXVIII OF 2024.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA ANCIENT MONUMENTS AND ARCHAEOLOGICAL SITES AND REMAINS ACT, 1960.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८.**

**महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

एचबी २३६७-१

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा प्रख्यापित केला होता ;

१९६१ चा महा. १२.

२०२४ चा महा. अशा. १०.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३३ मध्ये,-

१९६१ चा महा. १२.

(१) पोट-कलम (१) मधील, "पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल" या मजकुराऐवजी, "जी दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा जी दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :-

"(१अ) जो कोणी,-

(एक) संरक्षित स्मारकांच्या परिसरांमध्ये मद्य किंवा कोणतेही मादक पदार्थ सेवन करील किंवा ते बाळगील; किंवा

(दोन) संरक्षित स्मारकांच्या परिसरांमध्ये कोणतेही अश्लील कृत्य करील; किंवा

(तीन) संरक्षित स्मारकांच्या परिसरांमध्ये जुगार खेळेल,

त्याला, दोषसिद्ध झाल्यावर, जी सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा जी एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा दोन्ही शिक्षा होतील.";

(३) पोट-कलम (२) मधील,–

(अ) "पराकाष्ठा दोन हजार रुपये दंडाची शिक्षा होईल" या मजकुराऐवजी, "जी दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "पंचवीस रुपये" या मजकुराऐवजी, "पाचशे रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) पोट-कलम (३) मधील, "पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल ;" या मजकुराऐवजी, "जी दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल

इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल;" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मध्ये,–

१८९८ चा ५. २०२३ चा ४६.

(१) "दंड प्रक्रिया संहिता, १८९८" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) "संहितेच्या" या मजकुराऐवजी, "संहितेच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ३६ ची सुधारणा.

१८९८ चा ५. २०२३ चा ४६.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३६ मध्ये,–

(१) "दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हिचे कलम ३२" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ हिच्या कलम २३" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) "दोन हजार रुपयांपेक्षा" हा मजकूर, ज्या ज्या ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, त्या मजकुराऐवजी, "पन्नास हजार रुपयांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४१ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१ मधील, पोट-कलम (३) मध्ये,–

(१) खंड (एक) मधील, "पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल" या मजकुराऐवजी, "जी दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (दोन) मधील, "पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल" या मजकुराऐवजी, "जी दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) खंड (तीन) मधील, "पाचशे रुपये दंडाची शिक्षा होईल" या मजकुराऐवजी, "जी दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२४ चा महा. अध्या. १०.

**६.** (१) महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. १२) यामध्ये, महाराष्ट्र राज्यातील (राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जाहीर केलेल्या व्यतिरिक्त इतर) प्राचीन व ऐतिहासिक स्मारके आणि अभिलेख व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे आणि अवशेष जतन करण्यासाठी आणि तत्संबंधित बाबींसाठी अधिक चांगल्या तरतुदी करण्याकरिता तरतूद केली आहे.

मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी विविध किल्ले बांधलेले आहेत. हे किल्ले महाराष्ट्राच्या सुवर्ण इतिहासाचे साक्षीदार आहेत. महाराष्ट्र शासनाने, उक्त अधिनियमान्वये, विविध ऐतिहासिक किल्ले संरक्षित स्मारके म्हणून घोषित केलेली आहेत. उक्त अधिनियमान्वये संरक्षित स्मारके म्हणून घोषित केलेल्या चार किल्ल्यांसह, " मराठा मिलिटरी लँडस्केप " ला जागतिक वारसा म्हणून नामांकित करण्याचा प्रस्ताव भारत सरकारने अलीकडेच संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटनेला (युनेस्कोला) सादर केला आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा, अथवा या दोन्ही शिक्षा करण्याची तरतूद केली होती. उक्त अधिनियमाच्या कलम ४१ मध्ये, नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षेची तरतूद केली होती. सन १९६० पासून या शिक्षेमध्ये वाढ करण्यात आलेली नव्हती. भारत सरकारने, २०१० या वर्षी, प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९५८ (१९५८ चा २४) या खालील तत्सम अपराधांच्या शिक्षेत वाढ केली आहे. उक्त अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल कडक शिक्षा करण्यासाठी, कारावासाची शिक्षा, दोन वर्षांपर्यंत किंवा दंड, एक लाख रुपयांपर्यंत, वाढविण्याचे प्रस्तावित केले होते. नियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल दंडात देखील वाढ करण्याचे प्रस्तावित केले होते.

३. किल्ले व प्राचीन स्मारके यांचे पावित्र्य राखण्यासाठी, किल्ल्यांच्या व प्राचीन स्मारकांच्या परिसरांमध्ये कोणतेही अश्लील कृत्य केल्याबद्दल किंवा जुगार खेळल्याबद्दल, अथवा मद्य किंवा अन्य कोणतेही मादक पदार्थ सेवन केल्याबद्दल किंवा बाळगल्याबद्दल दंडात्मक तरतूद करण्याचे देखील प्रस्तावित केले होते. म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ३३ व ४१ यांमध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० यात सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (सन २०२४ चा महा. अध्या. १०), हा प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर, **देवेंद्र फडणवीस,**

दिनांक १५ डिसेंबर, २०२४. मुख्यमंत्री.

**सन २०२४ चे वि.स. विधेयक क्रमांक २८-महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० यातील उतारे.)**

**(सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२)**

**१.** ते **३२.** XX XX XX

**३३.** (१) जो कोणी- शास्ती

(एक) संरक्षित स्मारकाचा नाश करील, ते काढून घेईल, त्याचे नुकसान करील, त्यात फेरफार करील, ते विद्रूप करील, ते खराब करील किंवा त्याचा गैरवाजवी रीतीने उपयोग करील, किंवा

(दोन) संरक्षित स्मारकाचा मालक किंवा भोगवटा करणारा असून, कलम ९, पोट-कलम (१) किंवा कलम १०, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करील, किंवा

(तीन) संरक्षित स्मारकामधून कोणतेही शिल्पकाम, कोणतेही खोदकाम, कोणतीही प्रतिमा, उठावाची कामे, कोणताही शिलालेख किंवा इतर कोणतीही तत्सम वस्तू काढून घेईल, किंवा

(चार) कलम २१, पोट-कलम (१) चे उल्लंघन होईल असे कोणतेही कृत्य करील, तर त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) कलम १७, पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करणा-या कोणत्याही इसमास दोषी ठरविण्यात आले असता, पराकाष्ठा दोन हजार रुपये दंडाची शिक्षा होईल आणि दोषसिध्दीनंतरही उल्लंघन करणे चालू ठेवल्यास, अशारीतीने उल्लंघन करण्याचे चालू असलेल्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पंचवीस रुपये दंडाची शिक्षा होईल आणि न्यायालय ठरवील ती मुदत संपल्यानंतर असे उल्लंघन चालू ठेवण्यात आल्यास, राज्य सरकारला अशा इमारतीचा, इमल्याचा किंवा बांधकामाचा जो भाग अशा अधिसूचनेच्या उपबंधानुरुप नसेल तो भाग अशा उपबंधानुरुप करण्यासाठी असा भाग काढून टाकण्याकरिता, त्याच्या मते आवश्यक असतील अशी सर्व कृत्ये करण्याचा जादा अधिकार असेल, आणि राज्य सरकारला आलेला कोणताही खर्च दोषी ठरविण्यात आलेल्या इसमाकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोगा असेल.

(३) जो कोणताही इसम कलम २५, पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेचे उल्लंघन करून पुरातन वस्तू काढून नेईल त्यास दोषी ठरविण्यात आले असता पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल; आणि असे कोणतेही उल्लंघन केल्याबद्दल एखाद्या इसमास दोषी ठरविणा-या न्यायालयास अशा इसमास ती पुरातन वस्तू ज्या ठिकाणाहून काढून नेली तेथे परत आणून ठेवण्याविषयी निदेश देण्याचा अधिकार आहे.

**३४.** XX XX XX

**३५.** दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हीत काहीही असले तरीही, कलम ३३, पोट- कलम (१) ची कंडिका (एक) किंवा कंडिका ( तीन ) अन्वयेचा अपराध त्या संहितेच्या अर्थाप्रमाणे दखल घेण्याजोगा अपराध आहे असे समजले पाहिजे. विवक्षित अपराध दखल घेण्याजोगे असणे.

**३६.** दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हीचे कलम ३२ यात काहीही असले तरीही, राज्य १८९८ सरकारने या बाबतीत खास अधिकार खास दिलेल्या पहिल्या वर्गाच्या कोणत्याही फौजदारी न्यायाधीशाने आणि कोणत्याही प्रसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशाने या अधिनियमान्वये जो अपराध दोन हजार रुपयांपेक्षा अधिक दंडाच्या शिक्षेस पात्र असेल त्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या कोणत्याही इसमास दोन हजार रुपयांपेक्षा अधिक दंडाची शिक्षा देणे हे विधिसंमत असेल. दंडासंबंधी विशेष तरतुदी.

**३७. ते ४०.** XX XX XX

नियम करण्याचा अधिकार.

**४१.** (१) व (२) XX XX XX

(३) ह्या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमात त्या नियमांचा भंग केल्याबद्दल, -

(एक) पोट-कलम (२), कंडिका (अ) च्या संबंधात केलेल्या नियमाच्या बाबतीत, पराकाष्ठा तीन महिन्याच्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(दोन) पोट-कलम (२), कंडिका (ब) च्या संबंधात केलेल्या नियमाच्या बाबतीत, पाच हजार रुपये दंडाची शिक्षा होईल;

(तीन) पोट-कलम (२), कंडिका (क) च्या संबंधात केलेल्या नियमाच्या बाबतीत, पाचशे रुपये दंडाची शिक्षा होईल;

अशी तरतूद करण्याचा अधिकार आहे.

(४) XX XX XX

**४२ ते ४४.** XX XX XX

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८. ]**

**[ महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० यात सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

[ **श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री. ]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.